आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

११ ऑक्टोबर २०२४ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- दोन दिवसांच्या लाओस दौऱ्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी मायदेशी परतले
- चालू आर्थिक वर्षात प्राप्तीकर विभागाकडे आतापर्यंत १३ लाख ५७ हजार कोटी रुपये महसूल जमा
- महाराष्ट्रात आज विविध ठिकाणी पायाभूत विकास सुविधांचा प्रारंभ आणि भूमीपूजन
- जागतिक शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार यंदा जपानमधल्या निहोन हिदानक्यो या संस्थेला जाहीर

**आणि**

- उद्योगपती रतन टाटा यांचे सावत्र भाऊ  नोएल टाटा यांची टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी एकमतानं निवड

**<><><><><>**

दोन दिवसांच्या लाओस दौऱ्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी मायदेशी परतले. लाओसची राजधानी व्हिएन्तिआन इथं झालेल्या १९ वी पूर्व आशिया शिखर परिषद आणि २१ व्या आसियान शिखर परिषेदत प्रधानमंत्री मोदी सहभागी झाले होते. हिंद-प्रशांत प्रदेशाच्या शांतता तसंच प्रगतीसाठी एक सर्वसमावेशक, मुक्त, समृद्ध आणि शिस्तबद्ध वातावरण आवश्यक असल्याचं मत त्यांनी मांडलं. प्रत्येक समस्येचं निराकरण हे युद्धातून शक्य नाही. दहशतवाद हे जागतिक शांतता आणि सुरक्षेसाठी एक आव्हान असल्याचं सांगत प्रधानमंत्र्यांनी दहशतवादाविरुद्ध एकत्रितपणे काम करण्यावर भर दिला.

मायदेशी परतण्यापूर्वी प्रधानमंत्री मोदी यांनी लाओचे राष्ट्रपती थोंगलाओन सिसौलिथ यांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांनी  द्विपक्षीय संबंधांवर सविस्तर चर्चा केली या दौऱ्यात संरक्षण सहकार्य,सीमाशुल्क, दृकश्राव्य आणि वारसा संवर्धनासह सहा क्षेत्रात भारत आणि लाओ दरम्यान सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

<><><><><>

आर्मी कमांडर कॉन्फरन्समध्ये सहभागी होण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह सिक्कीमची राजधानी गंगटोक इथं दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत.  या परिषदेत धोरणात्मक बाबी आणि संरक्षण सिद्धतेवर चर्चा केली जाणार आहे. या दौऱ्यात संरक्षण मंत्री रस्ते प्रकल्प, प्रेरणा स्थळाचं उद्घाटन करतील. तसंच ऑक्टोबर २०२३ मध्ये हिमनदी सरोवर फुटून झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या २२ जवानांच्या स्मारकाचं अनावरणही करणार आहेत.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात प्राप्तीकर विभागाने आतापर्यंत १३ लाख ५७ हजार कोटी रुपये महसूल मिळवला आहे. यात ७ लाख कोटी रुपये वैयक्तिक प्राप्तिकर आणि ६ लाख कोटी रुपये कॉर्पोरेट प्राप्तीकराचा समावेश आहे. कालपर्यंत प्राप्तीकरखात्यानं सुमारे दोन लाख ३१ हजार कोटी रुपयांचा परतावा दिला आहे. निव्वळ करमहसुलात १८ टक्के म्हणजे सुमारे सव्वाअकरा लाख कोटी रुपयांची वाढ नोंदली गेली आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात आज विविध ठिकाणी पायाभूत विकास सुविधांचा प्रारंभ आणि भूमीपूजन करण्यात आलं. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या दक्षिण

धावपट्टीची आज यशस्वी चाचणी झाली. या धावपट्टीवर भारतीय हवाई दलाचं सी २९५ विमान यशस्वीरित्या उतरलं. केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, या कार्यक्रमाला उपस्थित होते.

सिडकोच्या आणि नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध नागरी सुविधा, प्रकल्पांचं लोकार्पण अणि महाराष्ट्र भवनाचं भूमिपूजनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज वाशी इथल्या सिडको प्रदर्शन केंद्रात झालं. यावेळी २४ जिल्ह्यातल्या १२ हजार ७६८ कोटी रुपये खर्चाच्या रस्ते विकास कामांचं भूमिपूजन सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते दूरस्थ पद्धतीने झालं.

रत्नागिरी जिल्ह्यातल्या १९ हजार ५५० कोटी रुपया गुंतवणूकीच्या वेल्लोर सेमीकंडक्टर प्रकल्पाचं भूमिपूजन आज पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते झालं.अहमदनगरमधल्या संगमनेर इथं आयोजित नारीशक्ती सन्मान कार्यक्रमात ५४ कोटींच्या विकासकामांचं भूमिपूजन आणि लोकार्पण आज महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

महाराष्ट्र सरकार आणि N I E L I T अर्थात राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभाग यांच्यात आज नवी दिल्ली इथं सामंजस्य करार झाला. या करारामध्ये कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रासाठी सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना, रोबोटिक्स, इंडस्ट्री 4.0, राज्यातल्या शासकीय तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयातल्या संशोधन आणि विकास केंद्र यांच्यासाठी थ्री डी प्रिंटिंग आणि सहाय्यक तंत्रज्ञानाचा यात समावेश आहे. यावेळी केंद्रीय इलेक्ट्रॉनिक्स आणि

माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. या करारामुळे विद्यार्थ्यांना उद्योगासाठी आवश्यक प्रशिक्षण मिळेल, असं मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं.

**<><><><>**

भारतीय नौदलाची नवकल्पनांवर तसंच स्वदेशीकरणावर आधारित असलेली तिसरी ‘स्वावलंबन’ परिषद येत्या २८-२९ ऑक्टोबरला दिल्ली इथल्या भारत मंडपम मध्ये भरणार आहे. त्याबरोबरच नौदलाशी संबंधित  अत्याधुनिक संरक्षण सामग्रीचं प्रदर्शन भरेल. या परिषदेला संरक्षण तज्ञ,  नवप्रवर्तक, लघु उद्योजक, वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी तसंच भांडवल पुरवठादार उपस्थित राहणार आहेत. त्यांना उदयोन्मुख तंत्रज्ञान, भविष्यातल्या युद्धनीती, स्वदेशीकरण तसंच नवकल्पनांबाबत विचार विनिमय करण्याची संधी लाभणार आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारने एक देश एक निवडणूक हा प्रस्ताव मागे घ्यावा अशी मागणी करणारा ठराव आज केरळ विधानसभेत मंजूर झाला. हा प्रस्ताव घटनाबाह्य असून यामुळे देशाच्या संसदीय लोकशाहीच्या वैविध्यपूर्ण स्वरुपाची हानी होईल, असं या ठरावात म्हटलं आहे.

**<><><><>**

जागतिक शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार यंदा जपानमधल्या निहोन हिदानक्यो या संस्थेला जाहीर झाला. हिरोशिमा आणि नागासाकी अणुबॉम्ब हल्ल्यातून वाचलेल्यांची ही संस्था जग अण्वस्त्रमुक्त करण्यासाठी काम करते.

संस्थेनं केलेल्या प्रयत्नांचा सन्मान म्हणून हा पुरस्कार या संस्थेला देत असल्यानं नॉर्वेजियन नोबेल समितीनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

लेबनॉनमधल्या परिस्थितीवर भारताने चिंता व्यक्त केली आहे. लेबनन आणि इस्रायलमधल्या बिघडत चाललेल्या परिस्थितीवर भारत लक्ष ठेवून असल्याचं परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या परिसरात असलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या शांतता प्रतिनिधीचं संरक्षण करण्यासाठी विशेष उपाययोजना करण्याची गरज असल्याचंही या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दुर्गापूजेच्या निमित्तानं देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. दुर्गादेवी शक्तीचं प्रतीक आहे, वाईट शक्तींवर चांगल्या शक्तींचा विजय म्हणून दुर्गापूजा साजरी केली जाते, असं राष्ट्रपती मुर्मू यांनी समाजमाध्यमावरल्या आपल्या संदेशात म्हटलं आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी विजयादशमीनिमित्त जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. यंदाची विजयादशमी सर्वांच्या जीवनात आनंद, समाधान आणि संपन्नता घेऊन येवो अशा शब्दांत राज्यपालांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

उद्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा मुख्य सोहळा नागपुरात साजरा केला जाणार असून दीक्षाभूमीवर आजपासूनच हजारों बौद्ध अनुयायी दाखल होऊ लागले आहेत. बौद्ध अनुयायांना प्रशासनातर्फे विविध आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या असून धम्मचक्र प्रवर्तन दिनाची जय्यत तयारी प्रशासनानं केली आहे.

दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य आणि समता सैनिक दल यांच्या उपस्थितीत भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांच्या नेतृत्वाखाली आज पंचशील ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी समता सैनिक दलाचे जवान, बौद्ध अनुयायी उपस्थित होते.

**<><><><><>**

उद्योगपती रतन टाटा यांचे सावत्र भाऊ नोएल टाटा यांची टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी एकमतानं निवड झाली आहे. टाटा ट्रस्ट ही टाटा समूहाची सामाजिक क्षेत्रात कार्य करणारी शाखा आहे. ट्रस्टच्या संचालक मंडळाच्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. नोएल टाटा सध्या टाटा स्टील आणि व्होल्टाससह इतरही कंपन्यांच्या संचालक मंडळाचे सदस्य आहेत.

**<><><><><>**

दिव्यांग व्यक्तींसाठी डिजिटल पेमेंट यंत्रणा सुलभ व्हावी यासाठी पेमेंट यंत्रणेचं पुनर्परिक्षण करावं तसंच त्यात सुधारणा करावी असे निर्देश रिझर्व्ह बँकेने सर्व पेमेंट सेवा पुरवठादारांना दिले आहेत. अर्थ मंत्रालयाने जारी केलेली मानकं आणि मार्गदर्शक तत्वांचं पालन पेमेंट सेवा पुरवठादारांसाठी बंधनकारक आहे, यंत्रणेत बदल करताना यंत्रणेच्या सुरक्षेशी तडजोड करू नये असंही रिझर्व्ह बँकेने सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय वस्तू आणि सेवा कर, मुंबई विभागानं ठाणे आणि पालघर जिल्ह्यात दोन मोठ्या बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट टोळ्यांचं जाळं उघडकीला आणलं. या कारवाईत ७६० कोटी रुपयांच्या खोट्या इन्व्हॉइसद्वारे १४० कोटी रुपयांचे बनावट इनपुट टॅक्स क्रेडिट दावे केल्याचं समोर आलं आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मोसमी पावसाने उत्तर प्रदेशातून संपूर्णतः तर आंध्र प्रदेश, बिहार, झारखंड आणि छत्तीसगडमधून अंशतः माघार घेतली आहे.

काल कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाची शक्यता आहे.

राज्याच्या सर्व भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे